# सापळा केस

दिनांक १७/०६३/२०२१

**रविंद्र रमेशराव सावंत वय ३९ वर्षे व्यवसाय सहायक निबंधक सहकारी संस्था ता.पुर्णा , वर्ग–२ रा.सावंत गल्ली झरी ता.जि.परभणी (वर्ग २) यांनी २५,०००/– रू लाच स्विकारलेची यशस्वी सापळा कारवाई.**

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.कार्यालय परभणी येथे दि. १६/०६/२०२१ रोजी तक्रार दिली की, ते धानोरा मोत्या, ता.पूर्णा येथील राहाणारे असुन शेती करतात. त्यांची विवीध कार्यकारी सेवा सहकारी संस्था नावाची संस्था असुन सदर संस्थेचे ते चेअरमन आहेत. तसेच त्यांचा भाउ नामे पांडुरंग लक्ष्मणराव डाखोरे याचे नावे विवीध कार्यकारी सेवा सहकारी संस्था नावाची संस्था (ब) ही संस्था आहेत संदर संस्थेचा चेअरमन पांडुरंग हा आहे. तर त्यांचा चुलत भाउ संभाजी .एकनाथ डाखोरे याचे नावे जय हनुमान धान्य अधिकोष सहकारी संस्थाचे चेअरमन आहे. तिनही संस्थेची नोंदणी सहायक निबंधक कार्यालय पूर्णा येथे झालेली असुन संस्थेच्या कामकाजावर सहायक निबंधक पूर्णा यांची देखरेख आहे त्यांच्या संस्थेच्या आणि भाउ पांडुरंग याच्या संस्थेकडुन चुकीच्या शेतकऱ्यांना शेती कर्जाचे वाटप करण्यात आले आहे तसेच संस्थेची वार्षिक सभा घेतली नाही हे अक्षेप घेवून संस्थेच्या विरोधात गावातील कांही व्यक्तीनी सहकार खात्याकडे तक्रारी केलेल्या आहेत. त्यांच्या संस्थेच्या बाबतीत कलम ८३ चा चौकशी अहवाल सहायक निबंधक पूर्णा येथे चौकशी अधिकारी यांनी अहवाल दाखल केला असुन सदर प्रकरण सहायक निबंधक पूर्णा यांचे कार्यालयात चालू आहे. संस्थेच्या विरूध्द असलेल्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी चौकशीसाठी त्यांना नोटीस मिळालेली असुन दि.१७/०६/२०२१ रोजी सहायक निबंधक सहकारी संस्था पूर्णा श्री सावंत साहेब यांचे कडे सुनावणी आहे सुनावणीचा निकाल देण्यासाठी सावंत साहेब मध्यस्थामार्फत लाचेची मागणी करीत आहेत वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत नमुद आलोसे यांनी दिनांक १७.०६.२०२१ रोजी तक्रारदार यांचे व त्यांचे भावाचे संस्थेच्या विरूध्द असलेल्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी व सुनावणीचा निकाल तक्रारदार याचे बाजुन देण्यासाठी ५०,०००/– रूपयेलाचेची मागणी केली. त्यानंतर दि. १७.०६.२०२१ रोजी सापळा कार्यवाही आजमाविण्यात आली असता आलोसे यांनी सहायक निबंधक कार्यालय येथील त्याचे कक्षामध्ये तक्रारदार यांचेकडुन सदर लाचेची रक्कमे पैकी पाहिला हप्ता २५०००/– रूपये पंचासमक्ष स्विकारली आहे. आलोसे यांना ताब्यात घेतले असुन त्यांचे विरूध्द पो.स्टे.पुर्णा येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

स्दरची सापळा कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्रीमती.कल्पना बारवकर, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री.भरत केशवराव हुंबे, पोह/हनुमंते, पोना/कटारे, पोना/कुलकर्णी, पोना/मुखीद, पोशि/शेख मुक्तार, पोशि/चटटे, मपोशि/दंडवते, मपोशि/टेहरे, चापोह/चौधरी, चापोह/हबीब अे.सी.बी. परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकांविरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचाराविरूध्द करण्यात येणाऱ्या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाच लुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनीक्रमांक ०२४५२–२२०५९७**

**टोलफ्रीक्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक,ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड – ८८८८८४१९६५
श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड – ९६६५४७९३३३
श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी – ७०२१००२११०